22:16 71%

Takale Jyaneswar New...
HD · 2 minutes ago

'द न्यूज बिज टाईम्स'

# गुरुपौर्णिमेनिमित्त अण्णासाहेब मगर महाविद्यालयात सुरक्षारक्षक व आदरातिथ्य कर्मचाऱ्यांचा सत्कार



**पुणे, प्रतिनिधी :**
अण्णासाहेब मगर महाविद्यालय, हडपसर येथे गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने एक आगळावेगळा आणि स्तुत्य उपक्रम राबवण्यात आला. महाविद्यालयातील सुरक्षारक्षक व आदरातिथ्य विभागातील कर्मचाऱ्यांचा यावेळी विशेष सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने व सरस्वती देवीच्या पूजनाने झाली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितिन घोरपडे ,उपप्राचार्य डॉ. प्रशांत मुळे, विभागप्रमुख डॉ. विलास वणी यांनी उपस्थितांचे स्वागत करताना गुरुपौर्णिमेचे महत्त्व उलगडून सांगितले.

त्यांनी सांगितले की, गुरु म्हणजे केवळ शिकवणारे शिक्षकच नव्हे, तर जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर मार्गदर्शन करणारे प्रत्येक व्यक्ती गुरुच असतात. आपल्या महाविद्यालयातील सुरक्षारक्षक व आदरातिथ्य कर्मचारी हेही आपल्या सुरक्षेचे व व्यवस्थापनाचे गुरुच आहेत.

विद्यार्थ्यांनी या कर्मचाऱ्यांना फुलांचा गुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन त्यांचा गौरव केला. यावेळी काही विद्यार्थ्यांनी आपल्या भावना व्यक्त करत या कर्मचाऱ्यांच्या समर्पणाचे आणि योगदानाचे कौतुक केले. कार्यक्रमाचे आयोजन कॉम्पुटर सायन्स शाखेतील विद्यार्थ्यांनी केले होते.

कार्यक्रमात सायबर सुरक्षेवरील परिसंवादात विद्यार्थ्यांनी QUICK HEAL FOUNDATION या योजेअंतर्गत सायबर शिक्षा सायबर सुरक्षा या उपक्रमाद्वारे सायबर सेक्युरीटी बद्दल माहिती दिली. या माध्यमातून कर्मचाऱ्यांना ऑनलाइन फसवणूक, सुरक्षित पासवर्ड्स, OTP फसवणूक, सोशल मीडियावरील सावधगिरी यासंदर्भात मार्गदर्शन करण्यात आले.

Reply